
दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com
# रयत समाचार
खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ३७९ वा ● मंगळवार, ता.१२ ऑगस्ट २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००

## शेतकरी स्वातंत्र्यासाठी निवडणूक पद्धतीत सुधारणा आवश्यक

### सत्ता आणि जनता यांमधील दरी कमी होणे गरजेचे

जनतेचे अनेक प्रश्न प्रलंबित राहतात. ते सुटत नाहीत. लोकप्रतिनिधी दुर्लक्ष करतात. त्यांना माहीत असते की, हे प्रश्न सोडवण्याचा आणि निवडून येण्याचा काही एक संबंध नाही. निवडणूक पद्धतीचे गणित आज लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या एकमेकांच्या हितसंबंधांच्या विरुद्ध झाले आहे. ही चिंतेची बाब आहे. आम्हाला वाटते की, शेतकरीविरोधी कायदे रद्द झाले तर देश बलवान होईल. ते रद्द व्हावे म्हणून आम्ही चळवळ करतो. शेतकरीविरोधी (सीलिंग, आवश्यक वस्तू, अधिग्रहण, आदी) कायदे कोण रद्द करणार? विधानसभा आणि लोकसभा. कारण हे दोन्ही सभागृह कायदे मंडळ आहेत. संविधानाने त्यांना विधी मंडळ म्हटले आहे. पण गेली दहा-बारा वर्षे आम्ही सातत्याने आवाज उठवत असलो तरी विधानसभा, लोकसभेत काही त्याचे पडसाद उमटतात नाहीत. अजिबात नाहीत. महाराष्ट्राच्या विधान परिषदेत खाजा बेग आणि सदाभाऊ खोत यांनी तेवढा उल्लेख केला. या दोघांच्या वक्तव्याची सरकारी पक्षाने घ्यावी तशी दखल घेतली नाही. पुन्हा सामसूम झाले. कायदे मंडळात जाणारेच जर बेकायदेशीर रीतीने, षडयंत्र आणि संगनमत करून जात असतील, तर तेथे दुबळ्यांचा आवाज कसा पोहोचेल? तेथे न्यायाची बाजू घेऊन कायद्यांचा विचार कोण करेल? चळवळीचे मुद्दे संसदेच्या दाराबाहेर, कधी जंतरमंतरवर तर कधी आजाद मैदानावर जाऊन मरतात. हे चळवळीचे मरण कसे थांबेल? जनता आणि संसद एकत्र येऊन देश कधी घडवतील? खऱ्या लोकशाहीची प्रस्थापना कधी होईल? भारताच्या लोकशाहीला लागलेले ग्रहण दूर करायचे असेल तर सर्वप्रथम निवडणूक पद्धतीत सुधारणा कराव्या लागतील. निवडणूक आयोग स्वायत्त असला पाहिजे, सत्ताधाऱ्यांची सोय पाहणारा असता कामा नये, मतदार याद्या निर्दोष असल्या पाहिजेत, या गोष्टी मूलभूत आहेत. ही सुरुवात आहे. आज निवडणूक आयोग सरकारचा बटीक बनला, असे चित्र स्पष्टपणे दिसत आहे. मतदार याद्या सदोष आहेत, मतदान प्रक्रियेचे व्हिडीओ नष्ट केले जात आहेत, या गोष्टी लोकशाहीविरोधी आहेत.



**अमर हबीब**
आंबाजोगाई, महाराष्ट्र
८४११९०९९०९

कृषीवार्ता

हा स्पष्ट जनताद्रोह आहे. या निमित्ताने निवडणूक सुधारणेबद्दल आपण विचार करू. निवडणूक सुधारणा झाल्याशिवाय बदलत्या भारताच्या आकांक्षा पूर्ण होणार नाहीत. ७५ वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर आपण निवडणूक सुधारणासाठी काय सुचना करू शकतो? मी पुढील सुचना चर्चेसाठी मांडल्या आहेत. राजकीय पक्ष वा सरकारी नोकरांची सोय न पाहता केवळ १) मतदारांच्या सोयीचे काय आहे, २) खऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातात कारभार कसा जाईल, हे दोन निकष समोर ठेवून या सूचना केल्या आहेत. १) मतदान सप्ताह - आपल्या देशात मतदाराला मतदानासाठी एकच दिवस दिला जातो. हजारो मतदान केंद्रे उघडली जातात. त्यावर हजारो कर्मचारी तैनात केले जातात. मतदारांच्या रांगा लागतात. सगळे घाईघाईत केले जाते. म्हणजे आपल्या देशात मतदान उरकले जाते. एका दिवसात मतदान घ्यायचे असल्यामुळे कर्मचारी मोठ्या संख्येने लागतात. पोलिसांवर ताण पडतो. एक दिवसात मतदान होत असल्यामुळे राजकीय पक्ष 'भावना भडकावण्याचा' खेळ खेळू शकतात. गैरसमज पसरवू शकतात. उमेदवारांना प्रचारासाठी पंधरा दिवस देता, तसे मतदारांना मतदानासाठी आठ दिवस का नाही? असा माझा साधा प्रश्न आहे. मतदानसप्ताह केला तर लोकांना त्यांच्या सोयीनुसार मतदान करता येईल. निवडणुकीसाठी सुट्टी जाहीर करण्याची (जिचा लाभ फक्त सरकारी-नीम सरकारी कर्मचाऱ्यांनाच होतो) आवश्यकता पडणार नाही. सलग आठ दिवस मतदान असल्यामुळे मतदान केंद्रांची संख्या मर्यादित ठेवता येईल. मतदानाचे प्रमाण वाढेल. मतदानाचे प्रमाण वाढल्यास निवडणुकीतील पैसा वाटपाचा प्रभाव कमी होईल. मतदानाचा कालावधी वाढल्याने राजकीय पक्षांना ताण वाढू शकतो. अर्थात लोकशाहीत मतदारांची सोय पाहणार कि राजकीय पक्षांची? अमेरिकेत अध्यक्षीय निवडणुकीचे मतदान अनेक दिवस चालते. आपल्या सरकारी कचेऱ्यात मतपेट्या ठेवल्या तर आपणही जास्त दिवस मतदान चालवू शकू. ज्या कार्यालयात पैशाची तिजोरी ठेवली जाऊ शकते तेथे मतपेटीच्या सुरक्षिततेची चिंता करण्याचे कारण नाही. या मतपेट्या इंटरनेटशी जोडल्या तर त्यातील डाटाही सुरक्षित राहू शकतो. मतदानासाठी अधिक कालावधी देणे सुदृढ लोकशाही साठी आवश्यक आहे. २) दोन कार्यकाळ पुरे - एक व्यक्ती दोन कार्यकाळ (टर्म) पेक्षा जास्त काळ एका पदावर राहू शकणार नाही. अशी तजवीज करायला पाहिजे. अमेरिकेचा अध्यक्ष दोन टर्मपेक्षा जास्त काळ पदावर राहू शकत नाही. आपल्या देशात अशा तजविजीची जास्त गरज आहे. या कायद्यामुळे कोणाही व्यक्तीची सत्तेत मक्तेदारी निर्माण होणार नाही. जास्त लोकांना लोकशाही प्रक्रियेत सहभागी होता येईल. ३) प्राधान्यक्रम - उमेदवार निवडीसाठी आपल्याकडे 'बहुमत' पाहिले जात नाही. 'सर्वाधिक मत पाहिले जाते. बहुमत आणि सर्वाधिक मत यात फरक आहे. त्यामुळे ५० टक्क्यांपेक्षा कमी मत मिळवणारा उमेदवार अनेकदा निवडून येतो. अनेकदा नव्हे, सामान्यपणे सर्वाधिक मते घेणाराच विजयी घोषित केला जातो. ही लोकशाहीची चेष्टा आहे. खरी लोकशाही रुजवायची असेल व खऱ्या लोकप्रतिनिधींच्या हातात सत्ता द्यायची असेल तर प्राधान्यक्रम पद्धत स्वीकारावी लागेल. प्राधान्यक्रम पद्धतीत मतदारांना आपल्या पसंतीचा क्रम नोंदविता येतो. पहिल्या फेरीत ५० टक्के मतदान कोणालाच मिळाली नाहीत तर दुसऱ्या पसंतीची मते मोजली जातात. जगातील अनेक लोकशाही देशात याच पद्धतीचा अवलंब केला जातो. आपल्याकडे विधानपरिषद व राज्यसभेचे उमेदवार निवडताना या पद्धतीचा वापर केला जातो. लोकसभा, विधानसभा व पंचायत राजसाठी प्रधान्यक्रम पद्धत स्वीकारणे काळाची गरज ठरली आहे. कारण हल्ली मतविभाजन करून, मतविभाजनासाठी खोटे उमेदवार उभे करून लोक निवडून येऊ लागले आहेत. 'प्राधान्य क्रम' पद्धत लागू झाली तर कर्मचाऱ्यांवर ताण पडू शकतो. निकालाला उशीर होऊ शकतो, पण खरे लोकप्रतिनिधी निवडून येण्याची शक्यता वाढते, हे इतर कोणत्याही गोष्टीपेक्षा जास्त महत्वाचे आहे. ४) मतदारसंघांची रचना - मतदार संघांची जी रचना आपण स्वीकारली आहे, ती इंग्लंडमधील हाऊस ऑफ लॉर्डस सारखी आहे. ती कालबाह्य आणि निरुपयोगी झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा ही कायदे मंडळे आहेत. लोक प्रतिनिधींनी तेथे जाऊन कायदे बनवावेत, अशी अपेक्षा असते. मतदारसंघातून निवडून आलेल्या बऱ्याच जनांना राज्य व राष्ट्रीय प्रश्न माहितच नसतात, किंवा त्यावरील उपाय सांगता येईल एवढा अभ्यास नसतो. म्हणून पुष्कळ लोकप्रतिनिधी कायदा बनविण्याच्या कामात प्रभावी ठरत नाहीत. यासाठी तीन स्तरावरील लोकप्रतिनिधी कायदे मंडळात जातील अशी सोय करावी लागेल. १) स्थानिक (५०%), २) राज्य (२५%), ३) राष्ट्रीय (२५%) अशा प्रकारचे तीन स्तरावरील मतदारसंघ तयार करावे लागतील. तीन मतदार संघांचा मिळून एक स्थानिक मतदारसंघ तयार करावा. मतदारांना तीन प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असेल. १) अनुसूचित जाती-जमाती, २) महिला, ३) खुला. या पद्धतीने ३३ टक्के आरक्षणाचा प्रश्न सुटू शकेल. स्थानिक प्रतिनिधित्व राहील. सभागृहातील ५० टक्के प्रतिनिधी स्थानिक मतदारसंघामधून निवडून आलेले असतील. उदाहरणार्थ लोकसभेत ५५० जागा आहेत. त्यातील २७५ उमेदवार स्थानिक मतदारसंघातून निवडून येतील. सभागृहातील २५ टक्के जागा या राज्यस्तरावर व २५ टक्के जागा राष्ट्रीयस्तरावरील मतदारसंघातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधीसाठी राहतील. राज्यस्तरीय मतदारसंघ म्हणजे पूर्ण राज्य एक मतदारसंघ मानला जाईल. तसेच राष्ट्रीय म्हणजे संपूर्ण देश हा मतदारसंघ मानला जाईल. राष्ट्रीय किंवा राज्य स्तरावरील प्राधान्यक्रम पद्धतीने ५०% हून अधिक मते घेणारे सभागृहाचे सभासद होऊ शकतील. विधानसभेत देखील याच तत्वावर उमेदवार निवडले जातील. सध्याच्या पद्धतीत जाती-धर्माचा वापर करून, पैसा वापरून लोक निवडून येऊ शकतात. राज्य आणि राष्ट्र मतदारसंघातून निवडून येण्यासाठी तेवढे काम करावे लागेल. चळवळीच्या लोकांना व्यापक मुद्द्यासाठी सभागृहात जाण्याची संधी मिळू शकते. ५) निवडणूक कायदे ठरविण्याचा अधिकार- निवडणूक विषयी कायदे ठरविण्याचा अधिकार केवळ संसदेला असू नये. त्यासाठी विविध वैधानिक व स्वायत्त संस्थांना एकत्र करून गठीत केलेल्या आयोगाला असावा. या आयोगातील लोक निवडणूक लढवणार नाहीत. खेळाडूंच्या संघाने खेळाचे नियम ठरवू नये, तसे निवडणुकीचे नियम संसदेने ठरवू नये. आज संसद निवडणूक पद्धत व नियम ठरवत असल्यामुळे त्यात बदल होत नाहीत. सत्ताधारी त्यांच्या सोयीचे पाहतात. नव्या व्यवस्थेत स्वायत्त संवैधानिक आयोगाला असे अधिकार द्यावेत. शेतकरीविरोधी कायदे रद्द करणे, काळाची गरज असताना देखील ते रद्द केले जात नाहीत. कारण आजच्या निवडणूक पद्धतीत शेतकरीविरोधी कायदे कायम सडवणे सत्ता ताब्यात येण्यासाठी व ठेवण्यासाठी सत्ताधाऱ्यांना आवश्यक वाटते. सत्ता आणि जनता यांच्यात प्रचंड दरी निर्माण झाली आहे. ही दरी कमी करण्यासाठी निवडणूक पद्धत बदलणे अत्यंत आवश्यक ठरले आहे. अधिक माहितीसाठी अमर हबीब यांना ८४११९०९९०९ या क्रमांकावर संपर्क साधावा.

**(लेखक किसानपुत्र आंदोलनाचे सक्रीय कार्यकर्ते आहेत)**

## राजे रघुजी भोसले यांची ऐतिहासिक तलवार राज्य सरकारच्या ताब्यात

### इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी वेधले होते लक्ष



**लंडन । रयत समाचार**

मराठा साम्राज्यातील अमूल्य ऐतिहासिक ठेवा असलेली नागपूरच्या भोसले घराण्याचे संस्थापक राजे रघुजी भोसले यांची तलवार अखेर राज्य सरकारच्या ताब्यात आली आहे. ही तलवार यापूर्वी लिलावासाठी निघाली होती. ता.२९ ;एप्रिल रोजी राज्य सरकारने ती खरेदी केली होती, मात्र काही तांत्रिक कारणांमुळे मध्यस्थामार्फत व्यवहार करावा लागला.

कोल्हापूरचे इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी या तलवारीच्या लिलावाकडे राज्य सरकार व इतिहासप्रेमींचे लक्ष वेधले होते. आज राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आ. आशिष शेलार यांनी लंडनमध्ये या तलवारीचा प्रत्यक्ष ताबा स्वीकारला. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता तलवार महाराष्ट्रात आणण्यात येणार असून तिचा कायमस्वरूपी ताबा राज्य सरकारकडे राहणार आहे. छत्रपती शाहू महाराजांनी 'सेनासाहिबसुभा' ही उपाधी बहाल केलेल्या राजे रघुजी भोसले यांनी मराठा साम्राज्याचा बंगाल, ओडिशा आणि दक्षिण भारतापर्यंत विस्तार केला होता. ही तलवार मराठा शैलीतील फिरंग पद्धतीच्या एकधारी पात्याची असून त्यावर सोन्याचे नक्षीकाम आहे. युरोपियन बनावटीच्या या पात्याच्या पाठीवर 'श्रीमंत रघोजी भोसले सेनासाहिबसुभा' असे सोन्याच्या पाण्याने लिहिलेले आहे. इतिहासकारांच्या मते, १८१७ मध्ये नागपूरात ईस्ट इंडिया कंपनीने भोसल्यांच्या खजिन्याची लूट करताना ही तलवार नेली असावी. आता दीडशे वर्षांहून अधिक काळानंतर ती पुन्हा मातृभूमीत येणार असल्याने ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी महत्त्वाचे पाऊल उचलले गेले आहे. आ. आशिष शेलार आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे हा ठेवा महाराष्ट्राच्या हाती लागल्याचे राज्य सरकारने समाधान व्यक्त केले आहे.




## मतचोरी विरोधात इंडिया आघाडीचा दिल्लीत मोर्चा

**नवी दिल्ली । रयत समाचार**

मत चोरीच्या विरोधात इंडिया आघाडीचे तब्बल ३०० खासदार दिल्लीत एकवटले होते. निवडणूक आयोगाच्या (EC) कार्यालयावर धडक मोर्चा काढत निष्पक्ष निवडणुका व लोकशाही वाचवण्याची ठाम भूमिका त्यांनी मांडली. शांततेत सुरू असलेल्या या मोर्चाला पोलिस यंत्रणेमार्फत अडथळे आणण्याचा आणि दडपण्याचा प्रयत्न झाल्याचे नेत्यांनी सांगितले. या आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्षासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह इंडिया आघाडीतील इतर पक्षांचे खासदार सहभागी झाले होते. हातात "वोट बचाओ, भारत बचाओ" आणि Why EC destroying video evidence ? अशा घोषवाक्यांचे फलक घेऊन आंदोलनकर्त्यांनी निवडणूक आयोगाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली. आंदोलनादरम्यान नेत्यांनी सांगितले की, हा लढा केवळ राजकीय पक्षांचा नाही, तर देशातील प्रत्येक नागरिकाच्या मतदानाच्या हक्काचा आहे. लोकशाही धोक्यात आली असून, मत चोरी करून सत्तेत आलेल्या सत्ताधाऱ्यांचा जाहीर निषेध करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.भारतीय नागरिकांना आवाहन केले की, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि निष्पक्ष राहण्यासाठी सर्वांनी एकत्र यावे आणि लोकशाही वाचवण्याच्या या लढ्यात सहभागी व्हावे.



## अन्यायकारक एस्मा कायदा त्वरित रद्द करा; कामगार सेनेची मागणी

**पणजी । रयत समाचार**

गोवा सरकारने औषध निर्माण कंपन्यांतील कामगारांना संप करण्यापासून रोखण्यासाठी लागू केलेला एस्मा कायदा तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी भारतीय कामगार सेनेचे सरचिटणीस डॉ. रघुनाथ कुचिक यांनी केली. अडीच वर्षांपासून हा कायदा लागू असून, त्यामुळे कामगारांच्या मूलभूत हक्कांवर गदा येत असल्याचा आरोप त्यांनी सोमवारी पणजी येथे झालेल्या पत्रकार परिषदेत केला. यावेळी शिवसेनेचे (उबाठा) जितेश कामत व अन्य पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. कुचिक म्हणाले, "कोविड काळात असा कायदा लागू करणे समजू शकते, मात्र अडीच वर्षांनंतरही तो मागे घेतलेला नाही. असे करणारे गोवा हे देशातील एकमेव राज्य असावे. मुळात कामगारांनी संपावर जाण्याची घोषणा केलेली नाही. आम्ही कंपन्यांशी चर्चेचा प्रयत्न केला, पण त्याकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. सरकार कुणाच्या दबावाखाली हा कायदा लावत आहे का, यामागे राजकीय हेतू आहे का? हे स्पष्ट व्हावे." ते पुढे म्हणाले की, या विरोधात गोवा उच्च न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली असून, याची सुनावणी १४ ऑगस्ट रोजी होणार आहे. काही दिवसांपूर्वी वेर्ना येथे विविध कामगारांची बैठक आयोजित केली होती; मात्र सरकारने दबाव आणल्याने दोन वेळा सभागृह नाकारण्यात आले. तिसऱ्या ठिकाणी बैठक झाली, पण तेथेही मोठ्या संख्येने पोलीस उपस्थित होते. "गोव्यातील कामगारांवर असणारा दबाव आणि दहशत आम्हालाही अनुभवास आली. हा कायदा मागे घेतला नाही तर आम्ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर या प्रश्नाला न्याय मिळवून देऊ," असा इशारा डॉ. कुचिक यांनी दिला.

## सरकारविरोधातील प्रत्येक आंदोलनात भाकपा पूर्ण ताकदीनिशी सहभागी होणार

### भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कार्यकारिणीत ठराव संमत

**मुंबई । रयत समाचार**

मतदारांच्या प्रश्नांना उत्तर देण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाची असताना, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मात्र निवडणूक आयोगाचे प्रवक्ते असल्याप्रमाणे वागत आहेत आणि मत चोरी प्रकरणी बाजू मांडण्याचा केविलवाणा प्रयत्न करत आहेत. मत चोरी करून सत्तेत आलेल्या सरकारविरोधात होणाऱ्या प्रत्येक आंदोलनात भारतीय कम्युनिस्ट पक्ष (C.P.I.) पूर्ण ताकदीनिशी सहभागी होईल,असा ठराव पक्षाच्या नुकत्याच झालेल्या राज्य कार्यकारिणीच्या बैठकीत करण्यात आला.



अध्यक्षस्थानी पक्षाचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य कॉम्रेड तुकाराम भस्मे होते. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक मुंबई येथे भूपेश गुप्ता भवन येथे संपन्न झाली. या बैठकीत लोकसभेतील विरोधी पक्षनेते तथा काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी मत चोरीच्या केलेल्या भांडाफोडीबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत बोलताना पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉम्रेड ॲड. सुभाष लांडे म्हणाले, राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध पुराव्यानिशी गंभीर तक्रार करत, मतचोरीचा आरोप केला आहे. राहुल गांधींच्या म्हणण्यानुसार, भाजप नेतृत्वाखालील सत्ताधारी आघाडीने निवडणूक आयोगाच्या मदतीने मतदार यादीत फेरफार करून सत्ता मिळवली आहे. याप्रकरणी देशपातळीवरील इंडिया आघाडीच्या आंदोलनाला भारतीय कम्युनिस्ट पक्षाने सक्रीय पाठींबा दिला आहे. खासदार राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगाने थेट उत्तर द्यायला हवे असताना भाजप नेतेच पुढे येऊन उत्तरे देत आहेत आणि मत चोरी प्रकरणी सारवासारव करण्याचा प्रयत्न करत आहेत. राहुल गांधी व इंडिया आघाडीने उपस्थित केलेले मुद्दे देशाच्या लोकशाहीच्या भवितव्यासाठी महत्त्वाचे असून, याबाबत निवडणूक आयोगाने त्वरित पारदर्शक उत्तर देणे आवश्यक आहे. बैठकीला अखिल भारतीय किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष कॉ. राजन क्षीरसागर, पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. राजू देसले, कॉ. शाम काळे, कॉ.डॉ. राम बाहेती, कॉ. प्रकाश रेड्डी, कॉ. स्मिता पानसरे, कॉ. नामदेव चव्हाण, कॉ. मिलिंद रानडे, कॉ.डॉ. महेश कोपूलवार, कॉ. शिवकुमार गणवीर, कॉ.ॲड. हिरालाल परदेशी, कॉ. अशोक सोनारकर, कॉ. माधुरी क्षीरसागर, कॉ. हौसलाल रहांगडाळे, कॉ. ॲड. बन्सी सातपुते, कॉ. अनिल घाटे, कॉ. अशोक सूर्यवंशी आदी नेते उपस्थित होते.

## मुळाप्रवरा वीजसंस्थेच्या दीड लाख सभासदांचा हक्क लाडक्या शासनाने हिरावला

### सभासदांमध्ये आजही असंतोषच, विखेंना संधी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

मुळाप्रवरा वीजसंस्थेवर अवसायक नेमून भाजप सरकारने सुमारे दीड लाख शेतकरी, व्यापारी आणि उद्योजकांचा हक्क हिरावून घेतला. संस्थेवर अवसायक नेमल्याने तालुक्यातील शेतकरी सभासदांचा हक्क संपुष्टात आला. याबाबत सभासदांमध्ये आजही मोठ्या प्रमाणात असंतोष धगधगत आहे. दरम्यान पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांना ही संस्था चालू करण्यासंदर्भात मोठी संधी आहे. श्रीरामपूर, राहुरी या दोन तालुक्याचे संपूर्ण तर संगमनेर, राहता आणि नेवासा तालुक्यातील मिळून सुमारे १८५ गावांमध्ये वीज वितरण करणारी संस्था म्हणून संपूर्ण आशिया खंडात या संस्थेचा नावलौकिक होता. संस्थेच्या वीजदर खरेदी निश्चितीवरून संस्थेची हेळसांड झाल्यामुळे सन २०११ पासून या संस्थेचे वीज वितरण बंद आहे.

मात्र तेव्हापासून तर जानेवारी २०२५ पर्यंत या संस्थेला कोट्यावधी रुपयाचे भाडे मिळाले आहे. संस्थेकडील असलेल्या पोकळ थकबाकीचा प्रश्न निकाली निघणार असला तरी संस्था राज्यकर्त्यांच्या इच्छाशक्तीमुळे पुन्हा पूर्ववत सुरू होणे अशक्य आहे. राजकारणातील काही विघ्नसंतोषी पुढाऱ्यांमुळे या संस्थेला मरणकळा सोसाव्या लागल्या. राज्यकर्ते वेगवेगळ्या विकासाच्या गप्पा आणि रोजगार निर्माण करण्याचे पोकळ आश्वासन देत असले तरी आजही ही संस्था सुरू झाली तर पुन्हा दोन ते तीन हजार बेरोजगारांना रोजगार निर्माण होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे केंद्रापासून राज्य सरकारपर्यंत सत्तेत आहेत. नागरिकांना नको असताना सर्वांच्या मागण्या पूर्ण केल्या जात आहेत. याउलट श्रीरामपूर, राहुरी तालुक्यातील शेतकरी, व्यापारी आणि उद्योजकांची संस्था चालू करण्याच्या मागणीकडे या तिघांनीही दुर्लक्ष केले आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे या संस्थेचे अनुभवी आणि दीर्घकाळ संचालक तसेच चेअरमनही राहिलेले आहेत. पालकमंत्री या नात्याने त्यांच्यावर या संस्थेच्या सुरू करण्याचे दायित्व आजही निश्चित आहे. विखे यांनी इच्छाशक्ती व्यक्त केलीच तर ही संस्था पुन्हा पुनर्जीवित होऊ शकते. संस्थेवर सध्या निबंधक रावसाहेब खेडकर हे अवसायक म्हणून काम पाहत आहेत.

**पुढारी गायब आणि हातही वर**

खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी खासदार सदाशिव लोखंडे, आमदार हेमंत ओगले, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, माजी आमदार लहू कानडे यांनी अलीकडे या संस्थेसंदर्भात बोलणे टाळले आहे. सद्यस्थितीत हे सर्व पुढारी गायब झाले आहेत. निवडणूक आली तरच या संस्थेचा विषय राजकीय व्यासपीठावर निघतो. निवडणूक झाल्यानंतर या विषयाला टाळले जाते. या सर्व पुढाऱ्यांनी आता या प्रश्नासंदर्भात हात वर केले असून तो प्रश्न माझा नाहीच असे दाखवून शेतकरी, व्यापारी, उद्योजक यांच्याशी प्रतारणा केली जात आहे. लोकसभा निवडणुकीत सदाशिव लोखंडे यांनी हा प्रश्न सोडविण्याची ग्वाही दिली होती, मात्र निवडणुकीत पराभव झाल्यानंतर हा प्रश्न त्यांनी निग्लेट केला. खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना या प्रश्नासंदर्भात बरीच माहिती आहे. मात्र त्यांना पक्षामुळे मर्यादा आल्या आहेत.




# ठेकेदारांची थकित बिले द्या; अन्यथा कार्यालयाला टाळे ठोकणार- गुंदेचा

## अधिक्षक अभियंत्याच्या खुर्चीला फुलांचा हार घालून निषेध

**अहमदनगर । रयत समाचार**

कंत्राटदार व ठेकेदारांच्या थकित देयकांच्या तातडीने मंजुरीसाठी बिल्डर असोसिएशनच्या वतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंत्यांच्या खुर्चीला फुलांचा हार घालून निवेदन चिकटविण्यात आले व निषेध व्यक्त करण्यात आला.

या वेळी असोसिएशनचे अध्यक्ष संजय गुंदेचा, उपाध्यक्ष राहुल शिंदे, सचिव बाळासाहेब मुरदारे, सहसचिव विष्णू तवले, उदय मुंडे, प्रितम भंडारी, संजय डोके, भाऊसाहेब सोनवणे, ईश्वर जंजिरे, महेश वाकचौरे, संजय फुंदे, शैलेश मेहेर, रमेश आबा तोरडमल, रामचंद्र रेपाळे, श्रीकांत दराडे, किरण पागिरे, देवेंद्र गुंड, सोमनाथ शेटे, महेश गायकवाड, निलेश रोकडे, ज्ञानदेव नजन तसेच आंदोलनासाठी खास संगमनेरहून आलेले सदस्य एन. के. गाडे, रामदास कल्हापुरे, एस. पी. गोडसे, संकेत काकडे, हर्षल काढाणे आदी उपस्थित होते. निवेदनात नमूद करण्यात आले की, विविध योजनांच्या निधीबाबत यापूर्वीही अनेक आंदोलने व निवेदने देण्यात आली; मात्र सरकारकडून ठोस उपाययोजना झालेली नाही.

मार्च २०२५ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारांना फक्त ७ टक्के निधी वितरित केला होता, त्यानंतर अद्याप कोणताही निधी मिळालेला नाही. संघटनेने वारंवार मागणी केली आहे की, मागील देयके पूर्ण केल्याशिवाय नवीन निविदा काढू नयेत. तसेच प्रलंबित देयकासाठी शासनाकडून ५ ते १० दिवसांत निधी उपलब्ध करून द्यावा. अन्यथा विभागाच्या कार्यालया बाहेर धरणे आंदोलन करण्यात येईल, असे आधीच लेखी कळविण्यात आले होते. मात्र या पत्राची दखल न घेता कार्यालयात अधिकारी अनुपस्थित असल्याचा आरोप करण्यात आला. ठेकेदारांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून, त्वरित निधी मंजूर करून थकित देयके अदा न केल्यास कार्यालयाला टाळे ठोकण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

# आरोग्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक–आबिद हुसेन

## स्वातंत्र्य दिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहमदनगर । रयत समाचार**

७८ व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून मुस्लिम सामाजिक प्रतिष्ठान व थोरात सुपर स्पेशालिटी आय केअर यांच्या वतीने शहरात घेण्यात आलेल्या मोफत नेत्र तपासणी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरात ३७५ रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करून गरजूंना मोफत चष्मे व औषधे वाटप करण्यात आले. माणिक चौक येथील चाँद सुलताना हायस्कूलमध्ये झालेल्या या शिबिराचे उद्घाटन प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आबिद हुसेन यांच्या हस्ते झाले. यावेळी मतीन खान, तन्वीर सय्यद, सद्दाम शेख, रिजवान शेख, मतीन शेख, शब्बीर खान, सईद खान, अल्ताफ लकडावाला, दिलावर शेख, अझहर काजी, अय्युब शेख, तन्वीर बागबान, मुबीन शेख, गनी राज, अकबर पैलवान



आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना आबिद हुसेन म्हणाले, ‘‘आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे ही मोठी चूक आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात डोळ्यांच्या आजारांकडे दुर्लक्ष केल्यास गंभीर समस्या उद्भवू शकतात. काही लोकांकडे वेळेअभावी तपासणी होत नाही, तर काहींना आर्थिक अडचणीमुळे उपचार मिळत नाहीत. अशा वेळी मोफत आरोग्य व नेत्र तपासणी शिबिरे हा मोठा आधार ठरतो.’’ डॉ. प्रीती थोरात यांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक त्या उपचारांचे मार्गदर्शन केले. शिबिरात निदान झालेल्या मोतीबिंदू व काचबिंदू रुग्णांवर अल्पदरात शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. तसेच अनेक गरजूंना मोफत चष्मे व औषधे वाटप करण्यात आले. या शिबिरासाठी हाजी जावेद, अहमद जावेद, संजय भिंगारदिवे, निलेश महाजन, निलेश खरपूडे, मोईज आबेदिन, हाजी जावेद कुरेशी, हाजी नजीर कॉन्ट्रॅक्टर, असीर पठाण यांचे सहकार्य लाभले. शिबिर यशस्वी करण्यासाठी थोरात सुपर स्पेशालिटी आय केअरच्या कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.



# रिमांड होममध्ये रक्षाबंधन उत्साहात

## रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलचा उपक्रम

**अहमदनगर । आबीद खान**

‘‘देणाऱ्याने देत जावे, घेणाऱ्याने घेत जावे‘‘ या उक्तीप्रमाणे आणि या रोटरीच्या घोषवाक्यानुसार, रोटरी क्लब ऑफ अहमदनगर सेंट्रलतर्फे रिमांड होममध्ये रक्षाबंधनाचा उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमासाठी मनोज चंगेडिया यांनी ५ गोण्या गहू, १ डबा तेल, मुलींसाठी सौंदर्यप्रसाधने, मेहंदी कोन व साहित्य दिले. निवृत्ती झिने यांनी खाऊ साहित्य, विनोद बोरा यांनी सफरचंद पेटी, राजेश परदेशी यांनी राख्या, तर हरीश पेमदाणी यांनी १ डबा तेल दिला. सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून आपली सेवा दिली. कार्यक्रमास पीडीजी शिरीष रायते, ईश्वर बोरा, विनोद बोरा, निवृत्ती झिने, मनोज चंगेडिया, राजेश परदेशी, संजय मुनोत, अजय गांधी, विजय जुंदरे, अमृत कटारिया, नरेंद्र चोरडिया, सुजाता कटारिया, मनीष बोरा, नीलम परदेशी, साजरी परदेशी, रिमांड होम संस्थेच्या सचिव फातिमा मॅडम, सर्व शिक्षक, मदतनीस तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षस्थानावरून बोलताना सुनील कटारिया म्हणाले की, रक्षाबंधन हा सण फक्त भाऊबहिणीच्या नात्याचा नसून प्रेम, विश्वास व संरक्षणाच्या वचनाचा उत्सव आहे. राखी ही फक्त दोऱ्याची गाठ नसून मनांना जोडणारी भावनिक नाळ आहे. स्वतःवर विश्वास ठेवा, शिक्षणाला प्राधान्य द्या व आपल्या स्वप्नांचा पाठलाग करा. रोटरी क्लब नेहमीच तुमच्या पाठीशी उभा आहे. मनोगत व्यक्त करताना पीडीजी शिरीष रायते यांनी सांगितले की, हा उपक्रम रोटरी सेंट्रलकडून गेल्या ३० वर्षांपासून सातत्याने राबवला जात आहे. श्रीमती फातिमा यांनी संस्थेच्या वतीने रोटरी क्लबचे आभार मानले. कार्यक्रमाचे आभार ईश्वर बोरा यांनी मानले.

# दिल है हिंदुस्तानी स्वातंत्र्यदिनानिमित्त देशभक्ती गीतांची सुरेल मैफल

**अहमदनगर । रयत समाचार**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला नगरकर रसिकांसाठी एक खास सांगितिक पर्वणी देण्यात येत असून ‘‘दिल है हिंदुस्तानी’’ या देशभक्ती गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन ता.१३ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता माऊली सभागृहात करण्यात आले. पी.आर. मिडिया आणि ऑरेंज इव्हेंट्स यांच्या संयुक्त विद्यमाने गेली सात वर्षे हा कार्यक्रम दरवर्षी होत असतो. या वर्षीही, देशप्रेमाचा सूर आणि स्वातंत्र्याच्या लढ्याची गाथा संगीताच्या माध्यमातून मांडणारी ही मैफल नगरच्या सांस्कृतिक जीवनात एक उजळ क्षण ठरणार आहे. मैफलीचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आणि डॉ. बापूसाहेब कांडेकर, आयुक्त यशवंत डांगे यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. यावेळी डॉ. प्रकाश कांकरिया, डॉ. सुधा कांकरिया, अजिनाथ हजारे, किरण वर्पे, डॉ. दमन काशीद, संतोष शिंदे, ज्ञानेश्वर गाडे, डॉ. इमरान शेख, विशाल बुऱ्हाडे, अल्ताफ सय्यद, स्वप्नील होले, प्रा. रवींद्र काळे, डॉ. रावसाहेब बोरुडे, गणेश गायकवाड, कडूभाऊ काळे, कुबेर पतके, डॉ. ईश्वर

दिल है हिंदुस्तानी.. The Musical Salute...

कणसे, डॉ. संतोष गांगर्डे, धनेश खत्ती, किरण गवते, भूषण ओसवाल, रोहित भगत, क्षितिज झावरे, बाबासाहेब डोंगरे, अमोल खोले, तुषार चोरडिया, निलेश चिप्पा, जयराज शेळके यांसह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती सचिन चंदनशिव व विजय साबळे यांनी दिली. या कार्यक्रमात अजरामर देशभक्ती गीतांच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा इतिहास, शौर्यगाथा आणि देशप्रेम व्यक्त केलं जाणार आहे.

गायक कलाकार म्हणून प्रा. आदेश चव्हाण, डॉ. दमन काशीद, नितीन निंबाळकर, राहुल सिसोदिया, भाग्यश्री डुंबारे (पुणे), रेणुका पवार, जालिंदर शिंदे, महेश घावटे, सुशील देठे, सागर मेहेत्रे, सुनील चांदणे, पूनम कदम, सागर होनराव, आरती पेरेपाडम, मुबारक शेख, ॲड. किरण जाधव, श्लोक गायकवाड यांची सुरेल गायन मैफल रंगणार आहे. कार्यक्रमाचे संगीत संयोजन निलेश सोज्वळ आणि एडविन पेरेपाडम यांनी केले असून फरहान शेख, सिद्धांत गायकवाड, विशाल बोर्डे, श्रीकांत गडकरी, अमित बरुआ हे कलाकार साथसंगत सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रियाज पठाण करणार असून, त्यांच्या खास शैलीतून मैफलीला एक वेगळाच रंग चढणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य दिले जाणार आहे. मोफत प्रवेशिका कुबेर मार्केट आणि माऊली कॅन्टीन येथे उपलब्ध असून, अधिक माहितीसाठी ९८८१७२५६९६ / ९८२२६४७८१५ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजक रियाज पठाण (पी.आर. मिडिया) आणि जालिंदर शिंदे (ऑरेंज इव्हेंट्स) यांनी केले आहे. ‘‘दिल है हिंदुस्तानी‘‘ हा केवळ कार्यक्रम नाही, तर देशभक्तीचा एक सुरेल झंकार आहे जो गेली सात वर्षे नगरकरांच्या मनामनात गुंजतोय. या सातव्या वर्षीही, तोच उत्साह, तेच प्रेम, आणि तीच मातृभूमीची ओढ घेऊन ही मैफल सज्ज होत आहे, आपल्या उपस्थितीने आपणही या क्षणाचे साक्षीदार व्हावे.

# काळे धंदे, भ्रष्ट कारभार, सत्ताधारी महाराष्ट्रावर भार

## भ्रष्ट मंत्र्यांच्या हकालपट्टीसाठी शिवसेनेची निदर्शने




**अहमदनगर । रयत समाचार**

महाराष्ट्रातील महायुती सरकारमधील भ्रष्टाचारामुळे राज्याची बदनामी होत असल्याचा आरोप करत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर निदर्शन केले. भ्रष्ट आणि कलंकित मंत्र्यांची तात्काळ हकालपट्टी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. या निदर्शनात नगर दक्षिण जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, नगर दक्षिण विधानसभा संपर्कप्रमुख जगदीश चौधरी, तालुकाप्रमुख बबनराव शेळके, माजी नगरसेवक योगिराज गाडे, युवासेना जिल्हाप्रमुख पप्पू भाले, मनोज गुंदेचा, रावजी नांगरे, जेम्स अल्हाट, महेश कुलकर्णी, चंद्रकांत शेळके, मारुती राठोड, रामकिसन भिसे, आदम पठाण, सुभाष बोरसे, गौरव ढोणे, आनंद राठोड, विलास उबाळे, महावीर मुथा, विकास भिंगारदिवे, आकाश आल्हाट, सुनील भोसले, अनिस चुडीवाला, शैलजा लांडे, उषा भगत, राजेश गारगूड, अजित हासे, प्रशांत पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. निवेदनात नमूद केले आहे की, राज्यातील काही मंत्री जुगार, जादूटोणा, भ्रष्टाचार व गैरव्यवहारात अडकले असून त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. कृषी मंत्र्यांना क्रीडा मंत्रिपद देणे, समाजकल्याण मंत्र्यांवर ६० कोटींचा घोटाळा व १५०० कोटींचा गैरव्यवहार उघड झाल्यानंतरही सरकार मौन बाळगत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. राज्यातील गृहमंत्र्यांच्या आईच्या नावे डान्सबार सुरू असून त्यावरही कारवाई न झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. भ्रष्टाचारातून लाभ घेणाऱ्या मंत्र्यांचे त्वरित राजीनामे घेऊन त्यांची हकालपट्टी करावी, अन्यथा आंदोलन तीव्र करण्याचा इशारा शिवसेनेने दिला आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक













सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)



# २९ ऑगस्टला राष्ट्रवादीचा भव्य शेतकरी मेळावा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

श्रीगोंदा तालुक्यातील प्रलंबित प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी मंगळवार, ता. २९ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाचा भव्य शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आल्याची माहिती राष्ट्रवादी नेत्यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी दत्तात्रय पानसरे म्हणाले, ''आम्ही वेगवेगळ्या निवडणुका लढवून काय परिणाम होतात, हे पाहिले आहे. त्यामुळे राजु नागवडे, राहुल जगताप, घनःश्याम अण्णा शेलार, भगवानराव पाचपुते, आण्णासाहेब शेलार, बाळासाहेब नाहटा आणि मी आम्ही सर्वांनी मिळून सर्वमान्य नेतृत्व म्हणून अजित पवार यांचे नेतृत्व मान्य केले. यापुढे येणाऱ्या प्रत्येक निवडणुका संघटित राहून एकत्रित लढवणार आहोत.'' ते पुढे म्हणाले, ''सात साथ करीत तालुक्यातील सर्व गावांमध्ये तळागाळापर्यंत जाऊन शेतकरी व नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्यांच्यावर चर्चा करण्यासाठी अजित पवार यांचा २९ ऑगस्ट रोजी श्रीगोंदा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी मोठा शेतकरी मेळावा आयोजित केला आहे.'' भगवानराव पाचपुते म्हणाले, ''श्रीगोंदा तालुक्यातील अनेक कामे प्रलंबित असून काही पूर्णत्वास गेलेली नाहीत. त्यांच्यावर चर्चा करण्यासाठीच अजित पवार यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.'' राजेंद्र नागवडे यांनी सांगितले, ''श्रीगोंदा तालुक्यातील पाणी, एमआयडीसी, दूध, शिक्षण, डिंभे धरणाची उंची, बोगदा अशा अनेक प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी आम्ही सर्वांनी विचारविनिमय करून एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे. यापुढील निवडणुका देखील एकत्रित लढविणार आहोत.'' राहुल जगताप म्हणाले, ''विकासाच्या दृष्टीने एकविचाराने चालून तालुक्यातील सीएसपी, एमआयडीसीसारखे महत्त्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी एकत्रित प्रयत्न करू.'' ''अजित पवार यांच्या विकासकामांच्या मोहामुळे आम्ही एकत्र आलो आहोत. महाराष्ट्राला दूरदृष्टीच्या नेत्याची गरज आहे. म्हणूनच अजित पवार यांना मुख्यमंत्री करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे काम करायचे आहे. प्रत्येक निवडणुकीत एकच उमेदवार देऊन सर्व सत्ता ताब्यात घेऊन शेतकरी व नागरिकांचे प्रश्न सोडवायचे आहेत,'' असे नेत्यांनी नमूद केले. शेतकऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांसह महंमद महाराज यांच्या भव्य मंदिराच्या बांधकामात अडथळा ठरणाऱ्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा १३ ऑगस्ट रोजी होणारा मेळावा काही तांत्रिक कारणास्तव पुढे ढकलण्यात आला असून तो आता मंगळवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात येणार आहे. सर्वच नेते आपल्या प्रचाराचा शुभारंभ महंमद महाराज यांच्या दर्शनानेच करतात. त्यामुळे श्रीगोंद्याचे ग्रामदैवत शेख महंमद महाराज यांचे भव्य, दिव्य मंदिर उभे राहिले पाहिजे, अशी भावना नेत्यांनी व्यक्त केली. या भव्य शेतकरी मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादीच्या नेत्यांनी केले.

# 'एक राखी जवानांसाठी' उपक्रमांतर्गत सव्वा लाख राख्यांचा श्रीनगरपर्यंत ऐतिहासिक प्रवास

**कोपरगाव । किसन पवार**



देशभक्ती आणि भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याला अभिवादन करत, संजीवनी युवा प्रतिष्ठानचे मार्गदर्शक विवेक कोल्हे यांच्या संकल्पनेतून गेल्या पाच वर्षांपासून राबवला जाणारा ''एक राखी जवानांसाठी'' हा उपक्रम यंदा अधिक व्यापक स्वरूपात पार पडला. यंदा तब्बल सव्वा लाख राख्या संकलित करून साईबाबांच्या पावन भूमी शिर्डीहून जम्मू-श्रीनगरपर्यंतचा ऐतिहासिक प्रवास करण्यात आला. २,२०० किलोमीटरचा प्रवास करत कोपरगाव, येवला, मनमाड, मालेगाव, धुळे, शिरपूर, सेंधवा, इंदोर, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, अंबाला, अमृतसर, पठाणकोट, कठूआ, जम्मू, उधमपूर, श्रीनगर अशा सात राज्यांमधून गेलेल्या ''राखी रथ'' यात्रेचे शेकडो ठिकाणी पुष्पवृष्टीने स्वागत झाले. यात्रेदरम्यान हजारो नागरिकांनी सैनिकांप्रती प्रेम आणि कृतज्ञतेचे संदेश राख्यांबरोबर दिले. जम्मू-श्रीनगर येथे प्रत्यक्ष सीमेवर रक्षाबंधनाचा सोहळा साजरा करण्यात आला. देशातील विविध राज्यातील बहिणींच्या प्रेमाने तयार केलेल्या राख्या सैनिकांच्या मनगटावर बांधल्या गेल्या. या प्रसंगी अनेक जवान भावूक झाले. सीमावर्ती भागातील ऑपरेशन काळात देखील ही राखी सुरक्षित पोहोचवल्याबद्दल जवानांनी युवा सेवकांचे मनःपूर्वक आभार मानले. ''या राख्या आम्हाला नव्या जोमाने देशरक्षणाची ताकद देतात आणि देश आमच्या प्रत्येक क्षणाला सोबत आहे हे अनुभवायला मिळते,'' अशी भावनिक प्रतिक्रिया जवानांनी व्यक्त केली. या सोहळ्यात काही सैनिकांनी सिंदूर ऑपरेशनदरम्यान राबवलेल्या यशस्वी योजना आणि त्या काळातील थरारक क्षणांची आठवण सांगितली. सण-उत्सवाच्या काळात कुटुंबापासून दूर राहावे लागते, पण अशा उपक्रमामुळे घरातील आपुलकीचा स्पर्श मिळतो, असे ते म्हणाले. संजीवनी युवा प्रतिष्ठानच्या या उपक्रमाने देशभक्ती, भावनिक ऐक्य आणि बंधुभावाचा संदेश अधिक दृढ केला आहे. ही यात्रा फक्त एक सामाजिक उपक्रम नसून, देशाच्या शूर जवानांप्रती प्रेम, सन्मान आणि कृतज्ञतेची एक प्रेरणादायी गाथा ठरली आहे.



# कर्जत-राशीन वाद सोडवण्यासाठी १५ ऑगस्टपर्यंत मुदत

## शांतता राखण्याचे सभापती राम शिंदे यांचे आवाहन

**अहमदनगर । रयत समाचार**

जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे ता. ११ ऑगस्ट जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत कर्जत शहर व राशीन येथे घडलेल्या घटनांसह वर्तमान कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीवर चर्चा झाली.

बैठकीला विधानपरिषद सभापती राम शिंदे उपस्थित होते. त्यांनी दोन्ही बाजूच्या काही लोकांशी स्वतंत्र चर्चा करून त्यांच्या मते जाणून घेतली. अनेक मुद्द्यांवर एकमत असले तरी काही मुद्द्यांवर मतभेद कायम असल्याचे स्पष्ट झाले. शिंदे यांनी सांगितले, दोन्ही बाजूंचे निवडक गावकरी प्रतिनिधी एकत्र बसून एकमताने प्रश्न सोडवावेत. त्यासाठी १५ ऑगस्ट २०२५ पर्यंत वेळ देण्याचे मी सुचवले आहे.

जर एकमत झाले नाही तर प्रशासनाने हस्तक्षेप करून योग्य निर्णय घ्यावा. शेवटी, शिंदे यांनी दोन्ही ठिकाणच्या जनतेला शांतता राखण्याचे आणि अफवांना बळी न पडण्याचे आवाहन केले.

# बेकायदेशीर वृक्षतोड; नागरिकांमध्ये संताप

**पाथर्डी । रयत समाचार**



तालुक्यातील माळीबाभळगाव हद्दीत गट क्रमांक ६४ आणि ६१ मधील राष्ट्रीय महामार्गालगत असलेली तब्बल २० ते २५ भरभक्कम लिंबाची वृक्षे बेकायदेशीरपणे तोडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. शासन एकीकडे वृक्षारोपणासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून पर्यावरण संवर्धनाचा नारा देत असताना, दुसरीकडे अशा प्रकारे निसर्गाची निर्लज्जपणे कत्तल होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या झाडांपैकी काही झाडे राष्ट्रीय महामार्गाच्या हद्दीत असल्याचा अंदाज आहे. अशा परिस्थितीत महामार्ग विभागाची अधिकृत परवानगी घेणे कायदेशीरदृष्ट्या आवश्यक असते, तसेच लिंबाची झाडे असल्याने वनविभागाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. मात्र, कोणत्याही परवानगीशिवाय ही तोड करण्यात आल्याचा संशय असून, संबंधितांच्या कायद्यावरील बेफिकीरीचे चित्र यातून

## तातडीने चौकशीची मागणी

स्पष्ट होत आहे. या प्रकरणी भ्रष्टाचार निवारण समितीचे अहमदनगर जिल्हा उपाध्यक्ष शमाआली पठाण यांनी वन परिक्षेत्र अधिकारी यांना निवेदन देऊन या बेकायदेशीर वृक्षतोडीचा तातडीने पंचनामा करण्याची व सखोल चौकशीची मागणी केली आहे. पठाण यांनी निवेदनात नमूद केले आहे की, झाडे नेमक्या कोणत्या मशीनद्वारे तोडली गेली, त्यानंतर ती कुठे नेण्यात आली, कोणत्या सॉमिल मालकांनी त्यांचा ताबा घेतला, आणि त्या झाडांची पुढील विल्हेवाट कशी लावण्यात आली, याचा तपास करून संबंधितांची नावे जाहीर करावीत. स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींनी या कृत्याला ''निसर्गावरील थेट आक्रमण'' असे संबोधत, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलली नाहीत, तर या विषयावर तीव्र लोकआंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# डॉ. स्वामिनाथन म्हणजे विज्ञान, राष्ट्रसेवा आणि शेतकऱ्यांप्रती निष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण- डॉ. खरबडे

**राहुरी । रयत समाचार**




डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्या संशोधनाचा गाभा अन्नधान्य उत्पादन वाढविणे हाच राहिला. त्यांनी विकसित केलेल्या गहू आणि तांदळाच्या उच्च उत्पादक वाणांमुळे देशातील अन्नधान्य उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आणि भारत अन्नधान्यात आत्मनिर्भर बनला. यामुळे देशात हरित क्रांतीचा उदय झाला. त्यांच्या कार्यामुळे केवळ उत्पादन वाढले नाही, तर शेतीच्या शाश्वततेवर भर देऊन शाश्वत शेती या संकल्पनेचा पुरस्कार त्यांनी केला. डॉ. स्वामिनाथन यांचे संपूर्ण आयुष्य हे विज्ञान, राष्ट्रसेवा आणि शेतकऱ्यांप्रती निष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण असल्याचे प्रतिपादन महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी केले. कृषी क्रांतीचे जनक डॉ. स्वामिनाथन यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी आणि सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित आंतरमहाविद्यालयीन टेबल टेनिस व बॅडमिंटन स्पर्धेचा शुभारंभ द्रोणागिरी हॉलमध्ये झाला. या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. सुधीर तांबे, विद्यार्थी कल्याण मंडळाचे डॉ. सुनील भणगे, क्रीडा अधिकारी डॉ. विलास आवारी, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, व्यवस्थापक प्रा. व्ही. बी. धुमाळ, प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ, प्रशासकीय अधिकारी प्रा. जी. बी. बाचकर, डॉ. व्ही. डी. वाळे तसेच विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व शिक्षक उपस्थित होते. डॉ. साताप्पा खरबडे पुढे म्हणाले की, डॉ. स्वामिनाथन यांचे संशोधन केवळ प्रयोगशाळांपुरते मर्यादित न राहता थेट शेतकऱ्यांच्या आयुष्यात उपयोगी पडले. सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात कृषी महाविद्यालयाने कमी कालावधीत उल्लेखनीय कार्य केले असून कृषी विद्यापीठ सदैव या महाविद्यालयाच्या पाठीशी राहील. प्रत्येकासाठी व्यायाम आणि खेळ महत्त्वाचा असून विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये न अडकता खेळांमध्ये सहभागी व्हावे, असे त्यांनी आवाहन केले. या कार्यक्रमात डॉ. सुधीर तांबे आणि डॉ. सुनील भणगे यांनीही मार्गदर्शन केले. आयोजित आंतरविभागीय टेबल टेनिस व बॅडमिंटन स्पर्धेत कोल्हापूर ते नंदुरबार या नऊ जिल्ह्यांतील ५५० खेळाडूंनी सहभाग घेतला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र वाघ यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले तर आभार प्रा. जी. बी. बाचकर यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्राध्यापक, टीम मॅनेजर आणि शिक्षक उपस्थित होते.



# घोटण येथे जंगी कुस्ती हगामा

**शेवगाव । शिवाजी घुगे**

तालुक्यातील ऐतिहासिक नगरी म्हणून ओळख असणाऱ्या घोटण येथे श्रावणी सोमवार निमित्त ग्रामस्थांच्या वतीने जंगी कुस्तीचे आयोजन करण्यात आले आहे.

घोटण येथील महादेव, अर्थात मल्लिकार्जुनेश्वर, यांची ख्याती सर्वदूर पसरलेली असून येथील मंदिर हे भाविकांच्या आकर्षणाचे प्रमुख केंद्र आहे. दरवर्षी श्रावणी सोमवार निमित्त हजारोच्या संख्येने दूरदूरवरून भाविक येथे येतात. श्रावण येण्याच्या सुमारे आठवडाभर आधीपासून मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने व स्थानिक भजनी मंडळींच्या सहकार्याने केले जाते. अनेक भक्त आपले नवस पूर्ण करतात, त्यावेळी पेढे तुला मोठ्या प्रमाणावर केली जाते. येथील मल्लिकार्जुनेश्वराला पेढ्याचा प्रसाद म्हणून नैवेद्य दाखवण्यात येतो. यासाठी आलेल्या भक्तांचे स्वागत सर्व गावकरी मोठ्या उत्साहाने करतात व त्यांना सहकार्य करतात.



# जनहितांच्या मागण्यासाठी संभाजी ब्रिगेडची आंदोलने

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सोमवार, ता. ११ ऑगस्ट २०२५ रोजी प्रशासनातील गैरव्यवहाराविरोधात संभाजी ब्रिगेडने तालुक्यात दोन ठिकाणी आंदोलने केली. पंचायत समितीसमोरील आंदोलनात तालुक्यातील पाझर तलावांची हद्द निश्चित करून अतिक्रमणास आळा घालावा, ठेकेदारांच्या प्रलंबित देयकांचे त्वरीत वितरण करून विकासकामांना गती द्यावी, शाळा व शैक्षणिक संस्थांमधील जात-धर्म आधारित आचरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, शिक्षणक्षेत्रात समता व समरसता निर्माण करावी, राहणीमान भत्ता घेणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करून बोगस भत्ता घेणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी व सरकारी निधीचा अपव्यय रोखावा अशा मागण्या करण्यात आल्या. याच दिवशी श्रीगोंदा नगरपरिषदेत नागरी सुविधांसाठी धरणे आंदोलनही झाले. यात नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, घंटागाडी सेवा नियमित व वेळेवर सुरू करणे, शहर कचरामुक्त करणे, सर्व खड्डे तात्काळ बुजवणे, सुयोग्य वाहन पार्किंगची व्यवस्था करणे, अतिक्रमण हटवून रस्ते मोकळे करणे, मोकाट कुत्रे व जनावरे यांना आळा घालणे, बायपास रोडच्या कडेला तार कंपाउंड करणे, खुल्या जागा व रस्त्यांच्या कडेला सीसी टीव्ही कॅमेरे बसवणे, बोगस स्पीड ब्रेकर बसविणाऱ्या एजन्सींवर कारवाई करणे, उघडी गटारे बंदिस्त करणे, पाणीपुरवठा दररोज सुरू करणे, तसेच मांडवगण रोडलगत भरत असलेल्या मंडईसाठी अधिकृत खुली जागा उपलब्ध करून देणे यांसह अनेक मागण्या करण्यात आल्या. या आंदोलनाची दखल घेऊन नगरपरिषद प्रशासनाने कारवाईचे लेखी आश्वासन दिल्याने नगरपरिषदेसमोरील आंदोलन स्थगित करण्यात आले.

# हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा

१२ ऑगस्ट हा दिवस जगभर जागतिक हत्ती दिवस म्हणून साजरा केला जातो. जगभरात हत्तींची संख्या झपाट्याने कमी होऊ लागली आहे. त्वचा आणि हस्तिदंती वस्तुंसाठी तस्करांकडून हत्तींची मोठ्या प्रमाणात शिकार केली जाते. एका अंदाजानुसार दररोज अवैध शिकारीमध्ये किमान १०० हत्ती मारले जातात म्हणून वर्ल्ड एलीफंट फाऊंडेशनने २०११ सालापासून १२ ऑगस्ट हा दिवस जागतिक हत्ती दिवस अर्थात वर्ल्ड एलीफंट डे म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. या दिवसाचे औचित्य साधून हत्तीचे पर्यावरणीय तसेच जीवशास्त्रीय महत्व याविषयी जनजागृती करण्यात येते. जगभरात आफ्रिका आणि आशियायी देशात हत्तींची संख्या सर्वाधिक आहे. जगातील ९० टक्के हत्ती या दोन खंडातच आढळतात पण आता या दोन खंडातही हत्तींचे प्रमाण घटू लागले आहे. अवैध शिकारींवर जर वेळीच अंकुश लावला नाही तर पृथ्वीवरून हत्ती नामशेष होऊ शकतात आणि जर पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर त्याचा मोठा परिणाम पर्यावरणावर होऊ शकतो. पृथ्वीवरून हत्ती नामशेष झाले तर पृथ्वीच्या वातावरणातील कार्बन डायऑक्साइड या वायूचे प्रमाण वाढण्याची शक्यता वर्तवली आहे. हत्ती कमी झाल्यास निर्माण होणाऱ्या धोक्यासंदर्भात सेंट लुईस विद्यापीठातील संशोधकांनी केलेले संशोधन नेचर जिओ सायन्स या नियतकालिकेत छापून आले होते. हे संशोधन प्रसिद्ध झाल्यानंतर जगभरातील पर्यावरण व वन्यजीवप्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम हाती घेतली. जगभरात ही मोहीम आता जोर धरू लागली आहे. पृथ्वीवरील सर्वात महाकाय व सर्वात बलवान शाकाहारी प्राणी म्हणून हत्तीची गणना होते. हत्तीच्या प्रचंड वजनदार आकारमानामुळे जंगलात एकप्रकारे ते बुलडोझरचे काम करतात. त्यांच्या या चालण्यामुळे ते जंगलात नव्या वाटा निर्माण करतात. गवत व विविध वृक्ष वेलिंच्या परागीभवनात हत्तींच्या हालचालींचा मोठा वाटा असतो. ते गवत तुडवतात. विविध जातींच्या झाडांची फळे आणि पाने खातात. काही वेळा ते जंगलातील वठलेली झाडे धक्का देऊन पाडतात. या सगळ्यांच्या त्या जंगलाच्या वनक्षेत्राच्या इकोसिस्टीमवर परिणाम होत असतो. हत्ती जंगलात असल्यामुळे झाडांची संख्या नियंत्रणात राहते. जंगलात वेगाने वाढणाऱ्या वनस्पती हवेतील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण वाढण्यास कारणीभूत असतात. विशेषतः आफ्रिकेतील हत्तींबाबत करण्यात आलेल्या संशोधनात असे आढळून आले आहे की हत्ती अशा वेगाने वाढत असलेल्या वनस्पतींची पाने खात असल्याने वातावरणात सोडण्यात येणारा कार्बन डायऑक्साइड कमी प्रमाणात सोडला जातो. मध्य आफ्रिकेतील कांगो प्रजासत्ताकाच्या अख्यातीरित येत असलेल्या जंगलात याबाबत संशोधन केले असता वरील निष्कर्ष संशोधकांनी काढले आहे. त्यामुळे हत्तींची संख्या वाढत राहिली तरच वातावरणातील प्राणवायू टिकून राहील आणि कार्बनचे प्रमाण कमी होईल हे जाणूनच पर्यावरण आणि वन्यजीव प्रेमींनी हत्ती वाचवा मोहीम सुरू केली आहे. हत्ती वाचवणे ही काळाची गरज आहे. या मोहिमेत सर्व देशांनी सहभाग नोंदवायला हवा. पर्यावरण वाचवायचे असेल आणि वातावरणातील कार्बनचे प्रमाण कमी करायचे असेल तर हत्तींची अवैध शिकार रोखली पाहिजे. हत्तींची शिकार करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली पाहिजे. हत्ती वाचेल तरच वातावरण वाचेल, पर्यावरण वाचेल. हत्ती वाचवा पर्यावरण वाचवा.





श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

समाजसंवाद

# ५० वर्ष जुनी डाक सेवा इतिहासजमा

## रजिस्टर ऐवजी स्पीड पोस्टाचा वापर; नागरिकांवर आर्थिक भार

**नेवासा । विजय खंडागळे**

इंडिया पोस्टने रजिस्टर पोस्ट ही ऐतिहासिक सेवा १ सप्टेंबर २०२५ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. पन्नास वर्षांहून अधिक काळ सुरू असलेल्या या सेवेला आता अलविदा देत, ग्राहक व संस्थांना स्पीड पोस्टचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या खिशावर आर्थिक भार वाढणार आहे. रजिस्टर पोस्टाची सुरुवातीची किंमत ₹२५.९६ असून, प्रत्येक अतिरिक्त २० ग्रॅमसाठी ₹५ आकारले जात होते. ही सेवा विशेषतः खेडी आणि लहान शहरांमध्ये स्वस्त व विश्वासार्ह म्हणून ओळखली जात होती. दुसरीकडे, १९८६ मध्ये सुरू झालेली स्पीड पोस्ट सेवा लोकप्रिय झाली असली तरी ५० ग्रॅमसाठी तिचा दर ₹४१ असून ती रजिस्टर पोस्टपेक्षा २०-२५ टक्के महाग आहे. पोस्टल विभागाचे सचिव व महासंचालक यांनी सर्व सरकारी कार्यालये, न्यायालये, शाळा, महाविद्यालये तसेच डाक सेवा मोठ्या प्रमाणावर वापरणाऱ्या ग्राहकांना १ सप्टेंबरपर्यंत पूर्णपणे स्पीड पोस्टकडे वळण्याचे आदेश दिले आहेत. विभागाच्या मते, स्पीड पोस्टमुळे पार्सल व पत्रव्यवहार जलद पोहोचतो आणि कामकाजात पारदर्शकता वाढते, हा त्यामागचा मूळ उद्देश आहे. गेल्या काही वर्षांत डाक सेवेचा वापर घटत चालला होता. डिजिटल युगामुळे जलद सेवांची मागणी वाढल्याने रजिस्टर पोस्टऐवजी स्पीड पोस्ट हा पर्याय पुढे आला आहे. त्यामुळे भारतीय डाक सेवेतले एक सुवर्णपान बंद होणार असून, अनेकांना तिची खंत राहणार आहे. मात्र, डिजिटल आधुनिक काळात व जलद सेवा स्वीकारणे ही काळाची गरज असल्याचा विचार पोस्ट विभागाने केल्याचे सांगितले जाते. दरम्यान, डाक सेवा व पोस्ट सेवा महागणार हे तितकेच खरे आहे.

# माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलचा पदग्रहण समारंभ थाटात संपन्न



**नगर तालुका । रयत समाचार**

तालुक्यातील सारोळा बद्दी येथील माऊंट सिनाय कॉन्व्हेन्ट स्कूलच्या विद्यार्थी संसदेचा पदग्रहण समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपनिरीक्षक शमूवेल गायकवाड उपस्थित होते. विद्यालयाच्या प्रथेप्रमाणे याही वर्षी हेड बॉय व हेड गर्ल यांच्या निवडीसाठी लोकशाही पद्धतीने निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात आली. या प्रक्रियामुळे विद्यार्थ्यांना निवडणूक प्रक्रियेतील नामांकन अर्ज भरणे, अर्जांची छाननी, उमेदवारांची अंतिम यादी, प्रत्यक्ष मतदान व मतमोजणी या बाबी समजून घेण्यास मदत झाली. यामध्ये ईशांत आठरे व अंजली वायकर यांची अनुक्रमे हेड बॉय व हेड गर्ल म्हणून तर व्हाइस हेड बॉय व गर्ल म्हणून मयूरेश चव्हाण व अनामिका अवसरकर यांची निवड झाली. त्याचप्रमाणे चारही कंपनीचे सिनियर छात्र म्हणून अजिंक्य कंठाळे, कृष्णा बनकर, जॉय साळवे व साक्षी राठोड यांची तर इयत्ता पहिली ते दहावीच्या वर्गांचे प्रमुख म्हणून अवनी खांदवे, अंश बोरूडे, विधी शेळके,विराज हजारे, आरोही कराळे, आदेश बेरड, अभिग्या साळवे, ओमकार कुटे, नुतन कोहक, माज शेख, आरोही म्हस्के, पृथ्वीराज पोकळे, प्रांजल शेडाळे, रूद्र गुंड, सहेर शेख, प्रणव बोरूडे, आराध्या बानिया, इयान घोडके, रूतुजा म्हस्के, अर्शद शेख व गौरी शेडाळे यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. मुख्याध्यापिका जयश्री खरात यांनी प्रास्ताविक केले. अर्चना केदार यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला तर पर्यवेक्षिका नेहा केदारे यांनी आभार मानले. उज्वला पंडित यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सविता पाटोळे, कविता आढाव, किशोर उबाळे व मुजाहिद शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.





# सेवाभावी विठ्ठल विधाते जगताहेत सेवाधर्म

**राजेंद्र देवढे । विशेष प्रतिनिधी**

पाथर्डी शहरातील सर्व स्तरांतील खवैयांच्या पसंतीस उतरलेल्या, पांडुरंग भिसे यांच्या लोकसेवा हॉटेलमध्ये काम करणारे विठ्ठल विधाते हे सेवाभावी वृत्तीमुळे चर्चेचा विषय ठरले आहेत. शहरातील माणिकदौंडी रस्त्यावर एक वर्षापूर्वी, पांडुरंग भिसे यांनी लोकसेवा नावाने शुद्ध शाकाहारी हॉटेल सुरू केले आहे. नावातच असलेला सेवा हा शब्द सार्थकी लागावा अशी सेवा या हॉटेलात दिली जाते. उंबरहंडी, शिंगोरी आमटी व मिसळ-ही या हॉटेलची विशेष वैशिष्ट्ये आहेत. त्याचबरोबर येथील चहा व बासुंदीही लोकप्रिय आहेत. अवघ्या १०० रुपयांत उपलब्ध होणारी येथील राईसप्लेट जगावेगळी आहे. पोटभर जेवण मिळणाऱ्या या राईसप्लेटमध्ये हव्या असतील तेवढ्या चपात्या, दोन पातळ भाज्या, एक सुकी भाजी व वरणभात असे पदार्थ असतात. त्यामुळे स्पेशल भाजीऐवजी राईसप्लेटलाच प्राधान्य दिले जाते. सकाळी नऊ वाजता येथे गरमागरम मिसळ-पाव किंवा एखाद्या ग्राहकाला पावाऐवजी चपाती हवी असेल तर ती दिली जाते. साधारण अकरा वाजल्यानंतर जेवण मिळण्यास सुरुवात होते. दुपारी चार वाजेपर्यंत खुले राहण्याची वेळ असली तरी गरजेनुसार वेळ वाढते. त्यानंतर सायंकाळी सात वाजता हे हॉटेल पुन्हा सुरू होते. सकाळी नऊ वाजता या हॉटेलचे संचालक पांडुरंग भिसे, ज्ञानेश्वर माऊली, बबलू व जालिंदर जाधव, विजय गोसावी व अंकितकुमार उर्फ छोटू, हे ग्राहकांच्या स्वागतासाठी सज्ज असतात. पांडुरंग भिसे यांच्या सौभाग्यवती वैजयंताताई, आई सीतामाई, वर्षा ठोंबरे, पूजा जाधव व अर्चना दिवटे यांच्यावर चपात्या बनविण्याची जबाबदारी असते. पांडुरंग भिसे यांचा मोठा मुलगा करण, किराणा व भाजीपाल्याची पूर्तता केल्यानंतर त्यांच्यात सहभागी होतो. छोटा मुलगा राज गरज पडेल तशी मदत करतो. इवलासा कार्तिकही विनाकारण लुडबूड करू पाहतो. या सर्वांत भाव खाऊन जातात ते सर्वात जेष्ठ सेवेकरी विठ्ठल विधाते... २८ वर्षांपासून ते पांडुरंग भिसे यांच्याकडे काम करत आले आहेत... मिश्कील स्वभाव व ग्राहकांना आग्रह करुन खाऊ घालण्यात त्यांचा हातखंडा आहे. ग्राहक येताच ते त्यांच्या नावानिशी ऑर्डर देतात, ''पांडुभाऊ, अमुक अमुक आले आहेत, त्यांना तमूक तमूक पदार्थ हवा आहे.'' त्यानुसार माऊली व पांडुरंग भिसे ताटं भरतात आणि विठ्ठल विधाते ती ग्राहकांसमोर आणून ठेवतात. या कामात इतरांची मदत होत असली तरी विठ्ठल विधाते यांची काम करण्याची पद्धत वेगळीच आहे.

अल्पावधीतच नावारुपास आलेले हॉटेल लोकसेवा शहरातील सर्व स्तरांतील खवैयांपासून राजकीय पुढाऱ्यांसह, साहित्यिकांच्याही पसंतीस उतरले आहे. खासदार निलेश लंके, ॲड. प्रताप ढाकणे, रयत समाचार या रयतेच्या दैनिकाचे संपादक भैरवनाथ वाकळे, सुप्रसिद्ध व्याख्याते वसंत हंकारे, लोकनेते अर्जुन तथा भाऊराव शिरसाठ, पुरोगामी विचार जगणारे गोविंद रुपनर, बाजार पेठेतील व्यापारी, शिक्षक, शिक्षिका, वारकरी संप्रदायातील संत-महंत, आंतरराष्ट्रीय कथावाचक, पत्रकार व गोरगरिबांसह उच्चभ्रू वर्गातील प्रभृतींनी येथील सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला आहे. या सर्वांना भोजन देत असताना विठ्ठल विधाते कमालीची तत्परता दाखवतात. येथे जेवण करत असताना विठ्ठल पांडुरंग ज्ञानेश्वर असा नामोल्लेख होत असल्याने, अप्रत्यक्षरीत्या ग्राहकांचाही नामजप होऊन जातो. अशोक व्यवहारे यांनी सुरू केलेल्या व सध्या बबनराव भगत चालवत असलेल्या शुद्ध सात्विक भोजन चळवळीचे केंद्र कृष्णा भोजनालयानंतर, पांडुरंग भिसे यांच्या लोकसेवा हॉटेलची ओळख निर्माण झाली आहे आणि तेथे कार्यरत असलेले, सेवाभावी विठ्ठल विधाते प्रामाणिकपणे सेवाधर्माचं पालन करत आहेत.

# न्यायाचे प्रहरी, कविमनाचा माणूस- पद्मश्री ॲड. निकम

## आरजे तेजस्विनी यांनी घेतलेली विशेष मुलाखत

१५ ऑगस्ट भारताचा स्वातंत्र्यदिन. देशाच्या सीमारेषेवर जवान आपल्या प्राणाची आहुती देतात, तर देशाच्या आत गुन्हेगारी, दहशतवाद, बॉम्बस्फोट याविरुद्ध लढणारेही वीर असतात. अशाच एका वीर, न्यायासाठी जीवन पणाला लावणाऱ्या पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम यांच्याशी मनमोकळा संवाद. मुलाखतीच्या दिवशी, सभागृहात प्रवेश करताना माझ्या नजरेने त्यांचं स्मितहास्य टिपल. कोर्टात कठोर आणि निर्धाराने उभा राहणारा हा माणूस, विद्यार्थ्यांच्या गर्दीत अगदी शांतपणे बसलेला दिसला. त्या क्षणी मला जाणवलं ही मुलाखत केवळ प्रश्नोत्तर नसेल, तर ती एक प्रवासकथा असेल.

**आरजे तेजस्विनी :** साहेब, पद्मश्री, झेड प्लस सिक्युरिटी असूनही तुम्ही इतके साधेपणाने, मनमोकळेपणाने भेटलात. या साधेपणाचं रहस्य काय?

**ॲड. निकम :** (हसत) पदव्या, सुरक्षा या माझ्या कामाचे उपफळ आहेत. खरा सन्मान तो आहे जो लोकांच्या मनात असतो. आई-वडिलांनी साधेपणाचे संस्कार दिले, आणि जळगावच्या मातीने ते घट्ट रुजवले.

**आरजे तेजस्विनी :** सरकारी वकील म्हणून कामकाज कसं असतं?

**ॲड. निकम :** सरकारी वकिलाचं काम फक्त कोर्टात युक्तिवाद करणं नसतं. ते एक संपूर्ण टीमवर्क असतं. पोलीस तपास करतात, सरकार मार्गदर्शन करतं आणि आम्ही न्यायालयात पुरावे सादर करतो. उलट तपासणी करताना गुन्हेगाराची खरी मानसिकता उघड करणं हे सर्वात महत्त्वाचं. अनेकदा त्या संवादातूनच आरोपीला आपल्या गुन्ह्याची जाणीव होते.



**टाइमलाइन आयुष्याच्या मोठ्या खटल्यांची झलक**

: १९९३ मुंबई बॉम्बस्फोट खटला; २५०+ मृत्यू, ७००+ जखमी. २००८ (२६/११) मुंबई दहशतवादी हल्ला; १६६ मृत्यू, ३००+ जखमी. २०१० अजमल कसाब दोषी ठरला; फाशी सुनावली. २०१६ पद्मश्री सन्मान प्राप्त.

**आरजे तेजस्विनी :** १९९३ चा बॉम्बस्फोट आणि २६/११ चा हल्ला. या दोन्ही खटल्यांत तुमचा अनुभव कसा होता?

**ॲड. निकम :** १९९३ चा बॉम्बस्फोट. मुंबईसाठी तो काळ असह्य वेदनेचा होता. प्रत्येक पुरावा जणू काचेचा तुकडा जपून हाताळावा लागला. तर २६/११ च्या हल्ल्यात, अजमल कसाबला दोषी ठरवणं ही फक्त कायदेशीर नव्हे तर राष्ट्रीय सन्मानाची लढाई होती. पाकिस्तानात जाऊन त्यांच्या खोटेपणाचा बुरखा फाडणं हे माझ्या कारकिर्दीचं अभिमानास्पद पान आहे. २६/११ च्या खटल्यादरम्यान, पुरावे गोळा करण्यासाठी आम्ही आणि तपास पथकांनी अनेक रात्र जागून काढल्या. कोर्टात दाखल होणाऱ्या प्रत्येक दस्तऐवजाच्या मागे तासन्तास पडताळणी, भाषांतर, तांत्रिक तपासणी झाली. हा भाग लोकांना दिसत नाही, पण हाच न्यायप्रक्रियेचा कणा असतो. देशभक्ती केवळ सीमा राखणाऱ्यांत नाही, तर न्यायासाठी लढणाऱ्यांतही तितकीच असते ॲड. उज्ज्वल निकम.

**आरजे तेजस्विनी :** लोक म्हणतात कोर्टात तुम्ही कठोर, पण बाहेरच्या जगात मृदू आणि कविमनाचे

**ॲड. निकम :** (डोळ्यात हलकी चमक) होय, कोर्टात मी कठोर असतो कारण तिथे माझा धर्म न्याय आहे. पण आयुष्यात मला कविता, गाणी आणि नातवंडांसोबत वेळ घालवायला आवडतो. माझ्या पत्नी ज्योतीताई, आई-वडिलांचे संस्कार, आणि जळगाव हे माझं आधारस्थान आहे.

**आरजे तेजस्विनी :** कोर्टातील एक लक्षात राहिलेली घटना?

**ॲड. निकम :** एका खटल्यात, आरोपी उलट तपासणीत एवढा कोलमडला की शेवटी म्हणाला 'सर, मी खरंच चुकीचं केलं.' त्या क्षणी जाणवलं शिक्षा ही फक्त न्याय देण्यासाठी नसते, ती माणसाला सुधारणारी असते.

**आरजे तेजस्विनी :** कायदे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना काय संदेश द्याल? ॲड. निकम : कायदा हा केवळ पुस्तकातील ज्ञान नाही, तर न्याय देण्याची कला आहे. सचोटी, अभ्यास, आणि संयम हे तीन गुण असतील तर तुम्ही मोठे वकील बनाल.

**आरजे तेजस्विनी :** नवीन युगातील गुन्हेगारीचे आव्हान?

**ॲड. निकम :** सायबर क्राईम ही आजची मोठी समस्या आहे. हॅकिंग, ऑनलाईन फसवणूक, डिजिटल पुरावे नागरिकांनी सावध राहणं गरजेचं आहे. कायदा आणि तंत्रज्ञान या दोन्हींची माहिती ठेवणं आता काळाची गरज आहे.

**आरजे तेजस्विनी :** ॲड. उज्ज्वल निकम हे न्यायासाठी निर्भयपणे उभे राहणारे, कठोर युक्तिवाद करणारे, पण अंतःकरणाने संवेदनशील; कवितेत रमणारे. त्यांच्या आयुष्याची कहाणी सांगते सत्य, सचोटी आणि सेवा या तिन्ही गोष्टी हातात असतील, तर कोणत्याही रणांगणात विजय मिळवता येतो. ही मुलाखत घेताना मला जाणवलं दिव्यत्वाची जेथे प्रचिती, तेथे कर माझे जुळती.